# India's Development Since Independence

(Social,Economical,CommercialandTechnological Advancements)

Editors

Dr. Naresh Vyankatesh Pinamkar
Dr. Prakash Ratanlal Rodiya



# India's Development Since Independence

(Social,Economical,CommercialandTechnological Advancements)

Late.Ramesh Warpudkar Colleege
Sopneth
Dist.Parbhani
(M.S.)

**Editor**

**Dr. Naresh Vyankatesh Pinamkar**

**Dr. Prakash Ratanlal Rodiya**

Aadhar Publications, Amaravati

# India's Development Since Independence

## (Social,Economical,CommercialandTechnological Advancements)


- Dr. Naresh Vyankatesh Pinamkar

  Dr. Prakash Ratanlal Rodiya



- *First published*, – **21th June – 2023.**



© Editor & Publisher



- **Published by**

Prof. Virag Gawande for

Aadhar Publications,

Behind Govt. VISH,

New Hanuman Nagar,

Amravati – 444 604.

- **Printed by**

Aadhar Publications,



Late Ramesh Warpudkar Colleege Sopneth Dist.Parbhani (M.S.)


- Notice

**The editor, publisher, owner, printer will not be responsible for the articles published in this issue. The articles published in this issue are the personal views of the authors.**



- Price : 400/-

- **ISBN-** 978-93-95494-32-8

# संगणकीय गुन्हे आणि सुरक्षा

डॉ सुनिता आ. टेंगसे

के. रमेश वरपुकर महाविद्यालयातील, सोनपेठ.जिल्हा परभणी.




**प्रस्तावना**

समाजातील सर्व व्यक्ति प्रस्थापित पद्धती नुसार वर्तन करतात असे नाही. समाजातील अनेक व्यक्तींची प्रस्थापित चाकोरी सोडून वर्तन करण्याची इच्छा असते, परंतु प्रत्यक्षात असे वर्तन करण्यास बहुसंख्य व्यक्ती तयार नसतात. ज्या व्यक्ती प्रस्थापित रूढी, नियम आणि कायदे यांना सोडून वर्तन करणाऱ्या असतात अशांचा उल्लेख विकृत स्वरूपाचे वर्तन करणाऱ्या व्यक्ती म्हणून केला जातो. ज्या अनैतिक आणि बेकादेशी वर्तनाला शासनाकडून शिक्षा केली जाते ते गुन्हेगारीवर्तन असेते. अशा गुन्हेगारांना प्रत्येक समाजात शिक्षा केली जाते, कारण त्यांचे वर्तन हे सामाजिक स्वास्थ्यासाठी धोकादायक असते, तसेच त्यांमुळे समाजातील इतर व्यक्तीच्या हक्कावर,स्वातंत्र्यावर गदा येते. परिणामी समाजाचे संघटन धोक्यात येते. सामान्य व्यक्ती असुरक्षित बनतात व लोकांमध्ये गुन्हेगारी मुळे दहशतीची परिस्थिती निर्माण होत असते. अशा स्वरूपाच्या व्यक्ती नियम न पाळता मनाला वाटेल तसे वागतात,कायदा पाळत नाहीत. त्यामुळे एका व्यक्तीने केलेल्या असे वर्तन इतर व्यक्तींसाठी त्रासदायक होते. अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्ती कायदे पाळत नाहीत, कायद्याच्या रक्षकांनाही घाबरत नाहीत. त्यामुळे कायदा मोडण्यात त्या नेहमी तयार असतात. यातुन गुन्हेगारीचा जन्म होतो.

**संशोधनाचा उद्देश**

१.गुन्हेगारी म्हणजे काय हे जाणून घेणे.

२.संगणकीय गुन्हे म्हणजे काय हे स्पष्ट करणे

Late.Ramesh Warpudka
Sopneth Dist.Parbhani (M.S.)

३.संगणकीय गुन्ह्याचे स्वरूप आणि प्रकार जाणून घेणे.
४.सायबर सुरक्षा कशी करावी याची मांडणी करणे
५.संगणकीय गुन्ह्यांना प्रतिबंध करणारे कायदे स्पष्ट करणे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत शोध निबंधासाठी संदर्भग्रंथ, पुस्तके, वर्तमानपत्रे, इंटरनेट वरील माहिती या दुय्यम तथ्य सामग्रीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

गृहीत कृत्य

संगणकीय गुन्ह्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

संगणकीय किंवा सायबर गुन्हे

संगणकीय गुन्हे म्हणजे संगणक प्रणालीमध्ये बेकायदेशीरपणे प्रवेश करून संगणक प्रणालीने कमी करणे तिचे नुकसान किंवा बदल करणे, तसेच महत्त्वाची माहिती, बौद्धिक मालमत्ता इत्यादी चोरणे किंवा संगणक जंतू व जिवाणू इत्यादी सोडून संगणकावर साठवलेली माहिती नष्ट करणे किंवा त्यात बदल करणे, व महत्त्वाचे म्हणजे संगणकावरून असलेली मेसेज प्रसारित करणे होय.

संगणकाय गुन्ह्याचे प्रमुख दोन प्रमुख विभागात वर्गवारी केली जाते.
१.जेथे संगणक हा गुन्ह्याचे लक्ष असतो.
२.जेथे संगणकाचा उपयोग करून गुन्हा केला जातो.

ज्यावेळी एखादा गुन्हेगार संगणक प्रणालीमध्ये बेकादेशीरपणे प्रवेश करून संगणक प्रणालीत नुकसान किंवा बदल करतो. त्यावेळी तो संगणक या गुन्हेचे लक्ष बनतो. उदाहरणार्थ खात्यावरून पैसे काढणे, आर्थिक लेखांमध्ये खाडाखोड बदल करणे, तसेचसंगणक प्रणालीमध्ये बेकायदेशीरपणे प्रवेश करणेमहत्वाची माहिती किंवा बौद्धिक मालमत्ता इत्यादी चोरणे, ईमेल द्वारा नुकसान पोहोचवणे, महत्त्वाच्या माहितीत खडाखोड किंवा बदल करणे, सेवा सुविधा नष्ट करण्याच्या हेतूने संगणक प्रणालीची चोरी करून संकेतस्थळांचा ताबा घेणे. संगणक प्रणालीचे स्वबळाणे नुकसान, व्हायरस हल्ला,इंटरनेट वेळेची चोरी इत्यादी गुन्हे करताना ज्यावेळी संगणक वापरतात त्यावेळी संगणक गून्हयाचे साधन होतो.उदाहरणार्थ संगणक प्रणाली व संगणकीय जाळे यावर

परिणाम करणारे गुन्हे जसे आर्थिक किंवा व्यावसायिक संगणक जाळे,प्रवासी कंपन्यांचे संगणक जाळे इत्यादीमध्ये संगणक जिवाणू पसरविणे किंवा संरक्षण सुरक्षा व बँकेच्या संगणकावरील वर्गीकृत माहिती मिळवणे अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये संगणक कार्यप्रणालीवर प्रक्रिया करून खालील गुन्हे केले जातात.
क्रेडिट कार्ड संबंधित अफरातफरीचे गुन्हे. दूरसंचार अपहार. इलेक्ट्रॉनिक रक्कम हस्तांतरणासंबंधीचे अपहरणाचे गुन्हे बँकेचे एटीएम कार्ड व खात्याच्या फसवणुकी करता उपयोग करणे. संगणकीय व्यापार व माहिती देवाणघेवाणीतील अपहार

**सायबर गुन्ह्यांचे प्रकार**

हॅकिंगकरने.प्राधिकरणाद्वारे, विशेषत: सुरक्षेच्या उद्देशाने लोकांच्या काही गटावर पाळत ठेवणे.बाल अश्लीलताहा सर्वात जघन्य गुन्ह्यांपैकी एक आहे जो जगभरात निर्लज्जपणे केला जातो आहे. कॉपराइट उल्लंघन करणे. एखाद्या व्यक्तीने किंवा संस्थेच्या पैशाचा बेकायदेशीर ताबा हा मनी लाँडरिंग म्हणून ओळखला जातो. सायबर खंडणीजेव्हा हॅकर एखाद्याचा ईमेल सर्व्हर किंवा संगणक प्रणाली हॅक करतो आणि सिस्टम पुनर्संचयित करण्यासाठी पैशाची मागणी करतो .सायबर दहशतवादसामान्यत हा जेव्हा कोणी सरकारी सुरक्षा यंत्रणा हॅक करते किंवा संगणक नेटवर्कद्वारे सुरक्षा व्यवस्थेवर आक्रमण करून सरकार किंवा मोठ्या संस्थेला धमकावतो. वेगवेगळया प्रकारे सायबर गुन्हेगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

**सायबर सुरक्षा**

सायबर सुरक्षा ही एक संभाव्य प्रक्रिया आहे. ज्याद्वारे माहिती आणि इतर संप्रेषण प्रणालींचे अनधिकृत वापर किंवा बदल किंवा चोरीपासून संरक्षण केले जाते.त्याचप्रमाणे, सायबर सुरक्षा हे संगणक, नेटवर्क, विविध प्रोग्राम्स, वैयक्तिक डेटा इत्यादींना अनधिकृत प्रवेशापासून संरक्षित करण्यासाठी एक उत्तम प्रकारे डिझाइन केलेले तंत्र आहे.सर्व प्रकारचा डेटा मग तो सरकारी असो, कॉर्पोरेट असो किंवा वैयक्तिक असो उच्च सुरक्षेची गरज असते; तथापि, सरकारी संरक्षण प्रणाली, बँका, संरक्षण, संशोधन आणि विकास संस्था इत्यादींशी संबंधित काही डेटा अत्यंत गोपनीय आहेत आणि या डेटाकडे दुर्लक्ष केल्याने संपूर्ण देशाचे मोठे नुकसान होऊ शकते. म्हणून, अशा डेटाला उच्च स्तरावर सुरक्षितता

आवश्यक आहे.डेटा सुरक्षित करण्यासाठी,आपली सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यासाठी, आपण खालील गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे .

*सुरक्षा आर्किटेक्चर, *नेटवर्क आकृती, *सुरक्षा मूल्यांकन प्रक्रिया, *सुरक्षा धोरणे,*जोखीम व्यवस्थापन धोरण,*बॅकअप आणि पुनर्संचयित प्रक्रिया, *आपत्ती पुनर्प्राप्ती योजना,*जोखीम मूल्यांकन प्रक्रियाया उपायांद्वारे आपण आपल्या डेटाची चांगली सुरक्षा व्यवस्था ठेवू शकतो आणि काही चूक झाल्यास आपलि डेटा देखील पुनर्प्राप्त करू शकतो.

सध्या भारतात नव्याने सुरू झालेल्या सायबर गुन्ह्यांमध्ये इंटरनेटच्या वाढत्या प्रसाराबरोबरच झपाट्याने वाढ होत आहे. वस्तुतः माहिती व तंत्रज्ञानाच्या व्यावसायिक उपयोग संगणकाच्या साह्याने गुन्हेगारांनी केलेल्या काही कृतीचा व टाळलेल्या बाबींच्या अनुषंगाने वातावरण निर्माण करणे हा सदर अधिनियमनाचा प्राथमिक उद्देश आहे. त्यामुळे माहिती व तंत्रज्ञान अधिनियम २०००मध्ये गुन्हेगारी स्वरूपाच्या कृत्याची विवेचन करण्यात आलेले आहे, तसेच इलेक्ट्रॉनिक अभिलेखनाच्या मान्यतेने व माहिती तंत्रज्ञान अधिनियम २०००च्या अनुषंगाने भारतीय दंड विधान संहितेच्या बऱ्याच कलमांमध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीमुळे सायबर क्षेत्राशी निगडित असणारे कित्येक गुन्हे भारतीय दंड विधान संहितेच्या दाखल करण्यात आले आहेत.

**संगणकीय गुन्हयांच्या विरुद्ध कायदे**

प्रत्येक समाजात व्यक्तींनी घरामध्ये, नातेवाईकांशी, रस्त्यावर, कामाच्या ठिकाणी, प्रवासात, सार्वजनिक ठिकाणी कसे वागावे याबाबत कायदे केलेले असतात. भारत देशाची सर्वोत्तम आणि सर्वश्रेष्ठ आशी राज्यघटना आहे.तो एक सर्वात मूलभूत कायदा आहे. स्वातंत्र्य आंदोलनातच स्वातंत्र भारत कसा असावा त्याचा सामाजिक, राजकीय, आर्थिक परिवर्तनाच्या दिशा कशा असाव्यात हे संविधानात स्पष्ट केले आहे.स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्याबरोबरच सामाजिक न्याय या मूल्याचाही आविष्कार आहे, म्हणून या मूल्यानुसार आपल्या देशात व्यवस्था आणि व्यवहार कसे असावेत याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी कायदे केलेले आहेत. आज आपल्या देशातील सर्व कायदे संविधानातील मूलभूत पाया प्रमाण मानून केलेले आहेत. निवडणुकांपासून,

सरकार कसे चालते,औद्योगिक, कृषी, शैक्षणिक, दळणवळण इत्यादी क्षेत्रातील विकास कसा व्हावा याबाबत कायदे केले आहेत. जगात अन्यायविरुद्ध कसे लढावे न्याय कसा मिळवावा आणि इतरांनाही कसे जगू द्यावे या दृष्टीने कोणती कर्तव्य पार पाडावी त्या दृष्टीने कायदे आहेत अशा प्रकारे कायदे समाजाचा मार्ग सर्वांसाठी सुकर करतात. कायदा पाळून समाजातील प्रत्येक जण वागत राहिला तर समाजातील दैनंदिन प्रासंगिक व्यवहार सुरळीत चालतात परंतु जर कायद्े मोडले तर बेकायदेशीरपणा वाढतो, गुन्हेगारी, गुंडगिरी, फसवेगिरीत वाढ होते आणि सर्वत्र असुरक्षितता वाढुन समाजात अंदाधुंद निर्माण होते.संगणकीय गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी भारत सरकारने प्रतिबंधात्मक उपाय योजना कायदे केलेले आहेत.संगणक वापराचे प्रमाण जसजसे वाढत गेले तसतसे संगणकीय गुन्ह्याचे प्रमाणही वाढत गेले यातून फसवणूक, हेरगिरी, चारित्र्यहनन असे अनेक गुन्हे घडत असल्याने सरकारने माहिती तंत्रज्ञान कायदा २०००मंजूर केला. या कायद्यानुसार दुसऱ्याच्या संगणकात अनाधिकाराने प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे.

*विचारलेली माहिती भरून न पाठवणे हा गुन्हा मानला गेला आहे, तसेच माहिती दडवून ठेवणे हा दंडणीय अपराध मानला गेला आहे.

*संगणकीय क्षेत्रातील दस्तऐवज अनाधिकाराने फेरफार किंवा बदल केल्यास संबंधित व्यक्तींना शिक्षा होते.

*संगणकातून विकृत, विभत्स किंवा अश्लील माहिती छायाचित्र इत्यादी माहिती प्रसारित करणाऱ्याला शिक्षा किंवा दंडाची तरतूद केली आहे.

*संगणकातील माहितीचा अनधिकृतपणे वापर करणाऱ्याला शिक्षेची तरतूद केलेली आहे.

*संगणकाच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या आदेशाचे पालन न करणाऱ्यास दंड किंवा कारावासाची शिक्षा होऊ शकते.

*संगणक वापरणार आणि संदिग्ध माहितीचे वितरण केले तर त्याला सात वर्षापर्यंत सक्त मजुरीची शिक्षा होऊ शकते.

*संगणकाच्या सुरक्षित, संरक्षित केलेल्या व्यवस्थेत जर एखाद्याने प्रवेश केला तर त्या व्यक्तीला दहा वर्षापर्यंत सक्त मजुरी व दंडाची शिक्षा होऊ शकते.

College

*संगणकाद्वारे प्रसारित होणाऱ्या माहितीचा जर एखाद्याने दुरुपयोग केला तर त्या आरोपीला दंड किंवा सक्षम करावासाची शिक्षा होते.

*संगणकीय गुप्त आणि खाजगी माहितीचा भंग करून ती वितरित करणाऱ्याला दंड किंवा करावासाचे शिक्षेची तरतूद आहे.

*संगणकाच्या माध्यमातून एखाद्या सहीची नकल करून खोटे प्रमाणपत्र तयार करून देणाऱ्या व्यक्तीला दंडाची किंवा सक्त मजुरीची शिक्षा होऊ शकते, व या खोट्या प्रमाणपत्राचा वापर करून लोकांची दिशाभूल करणे हा सुद्धा गुन्हा ठरवून त्यासाठी शिक्षेची तरतूद केली आहे.

सन २००८ मध्ये सन २००० च्या माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कार्याचा आढावा घेऊन त्यातील उणिवा दूर करून तसे विधेयक सादर केले गेले,या विधेयकाला २००८ रोजी संसदेने मान्यता दिली व नवा कायदा अमलात आला. सायबर क्राईम आटोक्यात आणण्यासाठी जरी कायदे केले असल्या मुळे त्यावर काही अंशी नियंत्रण मिळू शकले आहे.

संदर्भ

१.डॉ.मनवर. डी. एस. भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, अरुणा प्रकाशन, लातूर २००३, पान.१७९,१८०

६.https://blog.ipleaders.in/cyber-crime-and-cyber-security-an-overview/

७.https://www.tutorialspoint.com

२. डॉ. विनोद निताळे डॉ.सुधीर भटकर, डॉ. गोपी सोरडे, संपादीत माध्यमे आणि सामाजिक बदल अथर्व पब्लिकेशन धुळे २०१७, पानं २०

३.डॉ. काचोळे दा.धो. भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २००५,पानं नं.३१,३२

४. लोटे राज भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या पिंपळापुरे अँड पब्लिशर्स नागपूर २००७,पानं.न.१९४'१९५

५.डॉ. ताटके नीलम गुन्हा आणि समाज डायमंड पब्लिकेशन्स पुणे, २०१५, पानं नं.१,१०३ ते १०९

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth